بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ      نَحۡمَدُہٗ وَنُصَلِّیۡ عَلٰی رَسُوۡلِہِ الۡکَرِیۡمِ      وَعَلٰی عَبۡدِہِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡدِ
لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰہِ
دفتر مجلس انصار اللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in      محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# बदर युद्धासाठी पवित्र प्रेषितांची तयारी आणि प्रस्थान यांचा श्रद्धावर्धक प्रसंगवर्णन

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक १६ जून २०२३, मशिद मुबारक, टिलफोर्ड यु.के.

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهٗ لَا شَرِيْكَ لَهٗ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهٗ وَرَسُوْلُهٗ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ. بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ. اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ. الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ. مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ. اِيَّاكَ نَعْبُدُ وَاِيَّاكَ نَسْتَعِيْنُ. اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ. صِرَاطَ الَّذِيْنَ اَنْعَمْتَ عَلَيْهِمْ ۙ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ.

तशहहुद, तआवुज आणि सुरह फातिह च्यापठनानंतर हुजूर म्हणालेः

मक्का विरोधींनी युद्धासाठी केलेली तयारीबाबत उल्लेख झाला. यासदंर्भात आणखीन काहीं तपशील याप्रकारे आहेः उमैया बिन खल्फ आणि अबू लहब यांनी या युद्धापासून परावृत्त राहण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हा अबु जहल उमैया बिन खल्फ कडे आला आणि म्हणालाः

तुम्ही कुरैशच्या सरदारांपैकी आहोत जर तुम्हीच मागे राहिलात तर तुम्हां पाहून जनता देखील माघार घेतील, म्हणून तुम्ही नक्कीच आमच्यासोबत कूच करा जरी दोन तीन दिवस प्रवास करून तुम्ही पर या, पण चला.

उमैयाचा युद्धात सहभाग होण्यापासून परावृत्त राहण्यामागचा कारण असा होता की पवित्र पैगंबर यांनी या युद्धामध्ये त्याच्या मृत्युची पूर्वीच भविष्यवाणी केली होती. याची तपशील सहीह बुखारी मध्ये पहावयास मिळते-

अबु लहब याने त्याच्या जागी दुसऱ्याला पाठवले होते. आणि त्याचे मागे राहण्याचे कारण आतिका बिन अब्दुल मुत्तलीब चा तो स्वप्न होता. तो म्हणायचा की, आतिका चा स्वप्न (त्याची प्रमाणता) असा आहे जणू एखाद्या व्यक्तिने हातात एखादी वस्तू ठेवली आहे.

विरोधींचा ताफा मोठ्या उत्साहाने रवाना झाला. लष्करची संख्या एक हजार होती. त्यांच्याजवळ शंबर किंवा दोनशे घोडे, सातशे उंट, सहाशे चिलखत आणि भाले, तलवारी, धनुष्य अशी इतर युद्धसामग्री मोठ्या संख्येत होती.

कुरैश कबिल्याचे लोक मक्का सोडून मदीनाच्या दिशेने ८२ मैलांवर असलेल्या जोफा येथे पोहोचले. येथे जहीम बिन सल्त नावाच्या एका माणसाने लोकांना एक स्वप्न सांगितले ज्यामध्ये त्याने पाहिले होते की, एक माणूस घोड्यावर आला होता आणि एक उंट त्याच्यासोबत होता आणि तो म्हणाला, उत्बाह बिन रबीआ, शैबा बिन रबीआ, अबूल-हिकम बिन हिशाम म्हणजेच अबू जहल, उमय्या बिन खल्फ आणि कुरैशचे असे अनेक सरदार मरण पावले. मग त्याने आपल्या उंटाच्या गळ्यात भाला मारला आणि त्याला आमच्या तंबूकडे सोडले ज्यानंतर आमच्या सैन्याच्या प्रत्येक तंबूला त्या उंटाचे रक्त लागले. जेव्हा अबू जहलने हे स्वप्न ऐकले तेव्हा त्याने थट्टा आणि रागाने सांगितले की बनू अब्दुल मुत्तलिबमध्ये आणखी एक पैगंबर जन्माला आला आहे. उद्या जर युद्ध पेटले तर कळेल कोण मरण पावतो आणि कोण नाही. अबु सुफयान ने अबु जहल ला युद्धापासून परावृत्त राहण्याचा संदेश दिला होता.

अबु सुफयान चा संदेश ऐकून अबु जहल म्हणालाः देव शपथ! आम्ही नक्कीच बदरला पोहोचणार आणि तिथे उंट (भक्षणासाठी) जबह करणार, मद्यपान करणार आणि आमची सेविका आमच्यासमक्ष गीत गणार. आणि सर्वत्र अरब मध्ये आमच्या प्रवासाची आणि लष्कराची गाथा प्रसारित होईल आणि ते सदैव आमच्याकडून भयभीत राहतील.

अबु सुफयान च्या या संदेशावर बनू अदी आणि बनू जोहरा युद्धभूमितून परतले. अबु तालीब चे सुपुत्र तालीब देखील विरोधींसोबत होते, प्रवासादरम्यान विरोधी त्याना संबोधून म्हणाले आम्हाला माहित आहे की आमच्या सांगण्यावर तू आमच्यासोबत आला तर आहे पण तुझी सहसंवेदना आणि करूणा मुहम्मदशी आहे. हे ऐकल्यानंतर तालीब आपल्या सर्व साथींसह मक्का परतले. तिबरीच्या उल्लेखानुसार असे देखील सांगण्यात आले आहे की, तालीब, बलजबरीने आणि इच्छेविरूद्ध पथकासोबत निघाले होते परंतु कत्तल झालेल्या किंवा कैदी झालेल्या व्यक्तिंमध्ये त्यांचा उल्लेख आढळत नाही तसेच (असा उल्लेखही आढळत नाही की) ते आपले घर देखील पोहोचले नाही.

पवित्र पैगंबर (स.) १२ रमजान २ हिजरी मध्ये मदिनेतून रवाना झाले. त्यांच्यासोबत तीनशे पेक्षा अधिक जण सामील होते, पुष्कळ कथनांमध्ये ही संख्या ३१३ दर्शविली जाते, ज्यामध्ये ७४ मुहाजिरीन आणि बाकी अन्सार होते. हा पहिला असा युद्ध होता ज्यामध्ये अन्सार सामील झाले होते. हजरत उस्मान बिन अफ्फान यांना मदिने मध्येच थांबवण्याचा आदेश देण्यात आला होता कारण त्यांची पत्नी हजरत रुकैयाः आजारी होती.

जेव्हा पवित्र पैगंबर (स.) युद्धासाठी निघाले तेव्हा उम्मे वरका बिन्त नौफील नावाची महिला म्हणाली, मला सुद्धा या जिहाद मध्ये सामील करा. मी युद्धात जखमी होणाऱ्यांची देखरेख करेन आणि बहुतेक अल्लाह मला हौतात्म्य पत्करण्याची संधी देईल.

यावर पवित्र पैगंबर (स.) म्हणाले, तुम्ही येथेच रहा, अल्लाह निश्चितच तुम्हाला हुतात्माचा दर्जा देईल. हजरत उमर (र.ज.) च्या खीलाफत काळात उम्मे वरका बिन्त

नौफिल याना तिच्या गुलाम आणि दासीने कत्तल केले आणि अशाप्रकारे पवित्र पैगंबर (स.) यांनी केलेली भविष्यवाणी पूर्ण झाली.

या युद्धामध्ये मुसलमानांजवळ पाच किंवा काहीं कथनांनुसार दोन घोडे, ६० चिलखत, ७० वा ८० उंट होते, पवित्र पैगंबर (स.) यांनी साथीदारांसाठी अल्लाहकडे अशी प्रार्थना केली होती की, हे अल्लाह ते अनवाणी पाय आहेत त्यांना सवारी प्रदान कर, नग्न शरीर आहेत त्यांना वस्त्र प्रदान कर, अन्नहीन आहेत त्यांना अन्न प्रदान कर, ते गरीब आहेत त्यांना तू समृद्ध कर. आणि ही प्रार्थना स्वीकृत झाली आणि युद्धसमाप्तिनंतर कोणीही असा नव्हता ज्याला स्वारी, अन्न, वस्त्र मिळाले नाही. आणि युद्धकैदींचा मुआवेजा म्हणून इतकी रक्कम मिळाली की प्रत्येक कुटूंब धनसंपन्न झाला.

हजरत उस्मान खेरीज इतर काहीं साथीदार देखील होते, ज्यांना युद्धात सामील न होण्याचा आदेश पवित्र पैगंबर (स.) कडून प्राप्त झाला होता. त्यापैकी, हजरत अबू उमामाह बिन सालबा यांची आई आजारी होती, हजरत साद बिन उबादाह जे इतरांना युद्धाची तयारी करण्यात होते, त्यांना साप चावला होता म्हणून त्यांना युद्धात जाता आले नाही. त्याच प्रकारे, पवित्र पैगंबर (स.) ने अल्पवयीन मुजाहिदीनला परत जाण्याचा आदेश दिला. त्यामध्ये उमेर बिन अबी वक्कास यांचाही समावेश होता. परत जाण्याचा आदेश ऐकून ते रडू लागले, ज्यावर पवित्र प्रेषित (स.) यांनी त्याना परवानगी दिली. ते युद्धात सामील झाले आणि हौतात्म्य पत्कारलं.

हजरत मुस्लेह माऊद सांगतातः आज तो काळ आलेला आहे की लोक इस्लाम आणि धर्मासाठी त्यागार्पण करण्यापासून स्वतःला ओढत आहेत आणि अनेक सबबी देऊन पळ काढतात आणि म्हणतात की आम्हाला अमुक अमुक समस्या आहे. परंतु पवित्र पैगंबरांची अध्यात्मिक शक्ति पहा की त्यांच्या अधीन राहणाऱ्या मुसलमानांमध्ये असा उत्साह पहायला मिळत होता की पुरूष आणि स्त्रियाच नव्हे तर अल्पवयीन मुले आणि तरूण देखील या उत्साह आणि उमंगाने भरून गेलेले होते.

या प्रवासामध्ये जाण्यापूर्वी पवित्र पैगंबराने हजरत अब्दुल्लाह बिन उम्मे मक्तूम यांना अमीर नियुक्त केले होते. परंतु प्रवासादरम्यान त्यांना लक्षात आले की ते तर अंधळे आहेत आणि मदिनेच्या सुरक्षेमध्ये कोणतीही चूक करता कामा नये. आणि मग पवित्र पैगंबर यांनी अबु लबाबा बिन मंझर यांना अमीर बनवून मदिनेला पाठवले.तसेच आसीम बिन आदीला कुबा साठी अमीर नियुक्त केले. इस्लामी लष्कर चा ध्वज हजरत मसअब बिन उमैर यांना देण्यात आला. तो ध्वज पांढरा रंगी होता. याशिवाय दोन काळ्या रंगाचे ध्वज होते ज्यामधील एक हजरत अली आणि दुसरा एक अनसारी सोबतीला सोपवण्यात आला. हजरत अली जवळ असलेला ध्वज हजरत आयशा (र.जी.) यांच्या ओढणीतून तयार करण्यात आला होता. यासंबंधात एक कथन असे देखील आहे की, इस्लामी लष्कराकडे तीन ध्वज होते, मुहाजिरीन चा ध्वज हजरत मसअब बिन उमैर कडे होता, खजरज

कबिल्याचा ध्वज हबाब बिन मंझर कडे आणि औस कबिल्याचा ध्वज हजरत सआद बिन माजकडे होता.

हुजूर अनवर म्हणालेः उर्वरित तपशील इन्शाल्लाह पुढच्या प्रवचनात प्रस्तूत केली जाईल. आणि मग काहीं दिवंगतांचे वर्णन आणि नमाज ए जनाजा अदा करण्याची घोषणा केली. त्यांचे नाव याप्रमाणे आहेः

मा. शेख गुलाम रहमानी साहेब ऑफ यु.के, मा. ताहिर एजी साहेब ऑफ मेहदीआबाद, बुर्किनाफासो, मा. ख्वाजा दाऊद अहमद साहेब, मा.सय्यद तनवीर शाह साहेब सिसकाटाऊन कॅनेडा आणि मा. मुहम्मद जफरूल्लाह साहेब खान प्रचारक

اَلْحَمْدُ لِلّٰهِ ! اَلْحَمْدُ لِلّٰهِ نَحْمَدُهٗ وَنَسْتَعِيْنُهٗ وَنَسْتَغْفِرُهٗ وَنُؤْمِنُ بِهٖ وَنَتَوَكَّلُ عَلَيْهِ وَنَعُوْذُ بِاللّٰهِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَيِّئَاتِ اَعْمَالِنَا مَن يَّهْدِهِ اللّٰهُ فَلاَ مُضِلَّ لَهٗ وَمَنْ يُّضْلِلْهُ فَلاَ هَادِيَ لَهٗ وَنَشْهَدُ أَنْ لَآ اِلٰهَ اِلاَّ اللّٰهُ وَنَشْهَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهٗ وَرَسُوْلُهٗ، عِبَادَ اللّٰهِ رَحِمَكُمُ اللّٰهُ اِنَّ اللّٰهَ يَأْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِيْتَآءِ ذِى الْقُرْبٰى وَيَنْهٰى عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْكَرِ وَالْبَغْىِ يَعِظُكُمْ لَعَلَّكُمْ تَذَكَّرُوْنَ اُذْكُرُوا اللّٰهَ يَذْكُرْكُمْ وَادْعُوْهُ يَسْتَجِبْ لَكُمْ وَلَذِكْرُ اللّٰهِ اَكْبَرُ۔